# -:: जाहिरात ::-

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०११

## नांदेड जिल्हा पोलीस दल

जाहिरात क्रमांक:-०१/२०११ ठिकाण:-पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड दिनांक ०१/१०/२०११

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश ) नियम २०११ अणि शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार **नांदेड** घटकात खालील नमूद पदांसाठी पोलीस भरती आयोजित करण्यात येत आहे.

१. **पोलीस शिपाई :-**

| अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | २१ | १४ | ०२ | ०९ | ०२ | ०५ | २५ | १५४ | २६१ |

२. **बँडस्मन** :-वर नमूद पदांपैकी ०२ पदे उपलब्धतेनुसार बँडस्मन पदासाठी भरली जातील. वर नमुद पोलीस शिपाई पदांमधून चालक पोलीस शिपायांची पदे भरण्यात येतील. पोलीस शिपाई चालक या पदाकरीता वेगळी भरती घेण्यात येणार नाही.

३. पोलीस भरती -२०११ मध्ये उपलब्ध होणारी पदे दि.३१/१२/२०१२ अखेर पर्यन्त रिक्त होणा-या पदांची गणना करुन जाहिर करण्यात आलेली असल्याने अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल.

- वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे समक्ष प्राधिका-यास राहतील. सदर पदे मागील अनुशेष विचारत घेवून दर्शविण्यात आलली आहेत.

- खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, गृहरक्षक दल, महिला यांचे करिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ठ आहे.

शासनाने पोलीस भरतीचे आवेदन अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार यांचेकडून खालील दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- ०७/१०/२०११ रोजी ०९.०० वा. पासून.

२. ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ:- ०१/११/२०११ रोजी २३.५९ वा. पर्यंत.

३. बँकेत पैसे भरण्याचा शेवटचा दिनांक :- ०३/११/२०११ (बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत)

४. ट्रँन्झॅक्शन आयडी भरण्याचा शेवटचा दिनांक :- ०५/११/२०११ रोजी २३.५९ वा. पर्यंत.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना आणि भरतीची जाहिरात www.mahapoliceonline.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ज्या उमेदवारांकडे इंटरनेट सुविधा अपलब्ध नसेल किंवा इंतरनेटचा वापर करणेकरिता ज्यांना अडचणी येत असतील, त्यांचेकरिता ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** उघडण्यात आले आहे. उमेदवार सदर नमूद कोणत्याही एका केंद्रावर जावून येथील संस्थेच्या प्रतिनिधीच्या सहाय्याने नि:शुल्क ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करुन शकतात. या जिल्हयात असलेले ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** चे केंद्र व आवश्यक माहिती www.mahapoliceonline.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच या जिल्हयातील ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** ची माहिती जाहिरातीत दर्शविण्यात आलेली आहे. ज्या उमेदवारांना ऑनलाईन आवदेन अर्ज भरण्यास काही अडचणी असतील त्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयात ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता आवश्यक ती मदत पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकडून केली जाईल.

३. **परिक्षा शुल्क,** :- रु. १००/- राहील, ऑनलाईन आवेदन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहीत चलनाव्दारे उमेदवारांने भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रु.१००/- कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. बॅंकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बॅंकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या **Transaction ID** पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या नोंद केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही. महाराष्ट्रातील भारतीय स्टेट बॅंकेच्या शाखांची यादी www.mahapoliceonline.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**<u>उमेदवारांने सदर Transaction ID ची नोंद त्यांच्या आवेदन अर्जात खालील प्रमाणे करावी. :</u>**

१) बॅंकेत १००/- रुपये जमा केल्यानंतर बॅंकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या **Transaction ID** ची नोंद ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या केल्यावर शासकिय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वत:चा युजर आयडी व पासवर्डव्दारे प्रवेश **(Log in )** करुन **Apply Exam Post** या बटणावर क्लिक करावे व **Update Transaction ID** या बटणावर क्लिक करुन बॅंकेकडून प्राप्त झालेला **Transaction ID** अचुकपणे नोंदवावा. बॅंकेकडून प्राप्त झालेल्या **Transaction ID** ची नोंद अचुकपणे करण्यात आली असेल तरच उमेदवारांचा आवेदन अर्ज पूढील परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल अन्यथा पुढील कार्यवाही होऊ शकणार नाही. उमेदवाराच्या भरतीकरीता उघडण्यात आलेल्या प्रोफाईलवर, तसेच ईमेल आयडी तथा मोबाईल क्रमांक नमूद केला असेल तर पुर्ण भरलेला अर्जाबाबतचे पुष्टीकरण **( confirmation)** देण्यात येईल. ऑनलाईन आवेदन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहीत चलनाची प्रत **( Printout )** उमेदवारास निशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल. या नि:शुल्क सुविधामध्ये आवेदन अर्ज भरणे, बॅंक चलनाची प्रिंट आऊट मिळणे तसेच पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडीची नोंद करणे राहील.

२) उमेदवारानी संकेतस्थळावर नोंदविलेला **Transaction ID** वैद्य असल्यास **प्रवेशपत्र** उमेदवाराच्या भरतीकरिता उघडण्यात आलेल्या प्रोफाईलवर, तसेच त्याच्या नोंदणीकृत ई-मेल वर प्राप्त होईल. उमेदवारास पुष्टीकरण, प्रवेश पत्र किंवा इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रतीची प्रत **( Printout )** ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** कडून हव्या असतील तर प्रति प्रत रु ३/- अशा दराने **( Printout )** उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. **वेतनश्रेणी** : ५२००-२०२०० ( ग्रेड पे २०००) +५०० विशेष वेतन व इतर देय भत्ते.
पोलीस शिपाई पदावर नियुक्तीस पात्र ठरणा-या पोलीस शिपायांस परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरले.

५. **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दिनांक ३१/१०/२०११ रोजी कमीत कमी १८ वर्षे पुर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे, मागासवर्गीय उमदेवारांना ५ वर्षे शिथिलक्षम,

६. **शैक्षणिक अर्हता** : महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ ( सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ( इयत्ता १२ वी ) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे ( राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेंकेंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा-या १२ वी इय्यतेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत ) (१२वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षे बाबतच्या शासन निर्णय क्र. समक १०९९/१३४/मशि-४,दि १४/६/१९९९ व गृहविभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ चे नुसार )

७. शारीरिक पात्रता :-

| | **महिलांकरिता** | **पुरुषांकरिता** |
|---|---|---|
| अ) उंची | १५५ से.मी.पेक्षा कमी नसावी. | १६५ से.मी.पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. |

८. **शारीरिक चाचणी :-** शारीरिक पात्रता पुर्ण करणा-या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी खालील प्रमाणे घेण्यात येईल. (शारीरिक चाचणीत देण्यात येणा-या गुणांचा सविस्तर तपशिल www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. )

| **पुरुष उमेदवार** | **महिला उमेदवार** |
|---|---|
| १) ५ कि.मी.धावणे :- २० गुण | १) ३ कि.मी.धावणे :- २५ गुण |
| २) १०० मी. धावणे :- २० गुण | २) १०० मी. धावणे :- २५ गुण |
| ३) गोळा फेक :- २० गुण | ३) गोळा फेक (४ कि.ग्रॅ ):- २५ गुण |
| ४) लांब उडी :- २० गुण | ४) लांब उडी :- २५ गुण |
| ५) १० पुल अप्स :- २० गुण | **एकुण १०० गुण** |
| **एकुण १०० गुण** | |

९. **लेखी चाचणी :-** शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पुर्ण करतील. त्यांच्या पैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पद संख्येच्या १ : १५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना पोलीस भरतीच्या नियमानुसार १०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**लेखी चाचणीमध्ये खालील विषयांच्या समावेश असेल.**

१) अंकगणित २) सामान्यज्ञान व चालू घडामोडी
३) बुध्दीमत्ता चाचणी ४) मराठी व्याकरण

लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपचे राहतील.

**शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्येप्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ,दि.१६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या ओदशानुसार तयार करण्यात येईल. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास त्यांच्या गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग निर्णय प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार लावला जाईल.**

१०. **पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमदेवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत संबधीत उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल. अशा प्रकारचे बंधपत्र ( बँड/हमीपत्र ) संबधीत उमेदवाराकडून घेण्यात येईल.**

११. **पोलीस बॅन्डस्मन :-**

१) शैक्षणिक अर्हता : बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र ( इयत्ता १० वी ) उत्तीर्ण असणारे उमेदवार अर्ज करु शकतील.

२) शारीरिक पात्रता : बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना उंची मध्ये २.५ से.मी. व छाती मध्ये २ से.मी. न फुगवता व १. ५ से.मी. फुगवून इतकी सुट देय राहील.

सदर सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

३) अनुभव व इतर अटी : बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

४) पोलीस बॅन्ड पथकातील निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहील.

५) पोलीस बॅन्ड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्हाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

१२. **माजी सैनिक** :- शासनाने शासन निर्णय क्र. आरसीटी-०३०९/प्र.क्र.६९२/पोल-५अ,दि.०७/४/२०११ व शासन निर्णय क्र. आरसीटी-०३०९/प्र.क्र.६९२/पोल-५अ,दिनांक ९.९.२०११ अन्वये माजी सैनिकांना शारीरिक पात्रतेत सवलती दिल्या आहेत. सदर सवलती नुसार **माजी सैनिकांना शारीरिक चाचणीत देण्यात येणा-या गुणांचा सविस्तर तपशिल www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

१३. सेवाप्रवेश नियम २०११ नुसार अनुकंपा तत्वावरील भरतीमध्ये फक्त सेवेत असतांना मृत पावलेल्या कर्मचा-यांच्या एका पात्र वारसाचा समावेश असेल. सदर नियमानुसार पात्र ठरलेल्या वारसाची शारीरिक व लेखी चाचणी घेण्यात येणार नाही. त्यांना संबधीत घटक प्रमुखाकडे असलेल्या यादीवरील जेष्टाता क्रमानुसार व सामान्य प्रशासन विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती देण्यात येईल.

१४. पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणांमुळे वेद्यकिय अधिका-यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे. अशा

कर्मचा-यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस भरतीमध्ये सेवाप्रवेश नियम-२०११ मधील नियम ३(२)(ड) नुसार पात्र ठरविण्यात येईल. सदर नियमानुसार पात्रठरलेल्या उमदेवारास पोलीस भरती मध्ये आवेदन अर्ज भरणे आवश्यक राहील. तसेच सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणेच त्यांची शारीरिक व लेखी चाचणी घेण्यात येईल. सदर उमेदवारास अनुकंपा तत्वावरील उमेदवारांप्रमाणे उंची व छातीमध्ये सवलत देण्यात येईल.

टिप :- वैद्यकिय तपासणी तसेच नक्षलग्रस्त भागातील विशेष तरतुद खेळाडू, महिला, गृहरक्षकदल,माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त इत्यादी पदाकरीता असलेले आरक्षण, पोलीस दलातील कर्मचा-यांच्या कुटूंबियांबाबतच्या सवलती व अनुकंपा तत्वावरील भरती या बाबतची सविस्तर माहिती www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५. अर्ज करण्याची पध्दत :-

१. उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज भरुन घेण्याकरीता वास्ट इंडीया प्रा.लि. या संस्थेची निवड करण्यात आलेली आहे. उमेदवारांकडून आवदेन अर्ज भरुन घेण्याकरीता www.mahapoliceonline.org हा **U.R.L.** निर्माण करण्यात आला आहे.

२. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना संकेतस्थळावरउपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्याक्षिक (**Demo**) सदर संकेतस्थळावर पाहता येईल.

३. पात्र उमदवार वेब-बेस्ड (**Web-Based**) ऑनलाईन आवेदन www.mahapoliceonline.org या संकेतस्थळाव्दारे दिनांक ७/१०/२०११ ते दिनांक १/११/२०११ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (**Latest**) फोटो (रुंदी ३.५ से.मी. **X** ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३.५ से.मी. **X** २.५ से.मी.) आणि ३०० **DPI Resolution & 50 kb** कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

५. बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकिय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहीत पध्दतीने **Transaction ID** अचुकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेला **Transaction ID** ची नोंद अचुकपणे करण्यात आली असेल तरच भरती संदर्भातील पुढील प्रक्रिया होऊ शकेल.

६. विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ०१/११/२०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाव्दारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ०३/११/२०११ पंर्यत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

७. विहीत पध्दतीने सर्व टप्प्यातील अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही या कार्यालयाने विहीत केलेल्या कालावधीतच पुर्ण करणे आवश्यक आहे

८. कार्यालयाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार **Transaction ID** ची नोंद अचूक रित्या, विहीत पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

१६. उमेदवारासाठी आवश्यक सुचना..

१. प्रस्तूत भरतीकरीता सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज भरतीकरीता स्विकाले जाणार नाही.

२. उमेदवाराने उपलब्ध असलेल्या घटकापैकी एकाच घटकात आवेदन अर्ज करणे बंधनकारक राहील. एका पेक्षा जास्त भरती घटकात आवेदन अर्ज केल्यास सदर उमेवाराचा अर्ज रद्य करण्यात येवून त्याला भरतीकरीता अपात्र घोषीत करण्यात येईल आणि त्यांचे विरुध्द उचित दंडात्मक कारवाई केली जाईल. उमेदवारास दुस-या भरती ठिकाणी आवेदन अर्ज

करावयाचा झाल्यास त्याने पहिल्या ठिकाणी भरलेला आवेदन अर्ज रद्द करणे आवश्यक राहील.

३. उमेवारास पोलीस शिपाई पदावर ज्या घटकात नियुक्ती देण्यात आलेली आहे त्या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात त्याची बदली करता येणार नाही.

४. उमेवाराने अर्जाची नोंदणी केल्यानंतर तो त्याच्या स्वतःच्या नावात, वडीलांच्या नावात, आईच्या नावात, जन्मदिनांक, त्यांचे स्वतःचे छायाचित्र व त्याची सही आदि, मध्ये बदल करु शकत नाही. परंतु माहिती भरल्यानंतर **Submit** बटन दाबण्याच्या पुर्वी उमदेवार त्याचा पत्ता व इतर माहिती शैक्षणिक माहिती आदी. मध्ये बदल करुन शकतो. परंतु **Submit** बटन दाबल्यानंतर जर उमदेवारास माहिती मध्येबदल करावयाचा असल्यास उमेदवार त्याच्या **Profile** वर जाऊन **Cancel Application** बटन वर क्लिक करुन ॲप्लीकेशन **Cancel** करु शकतो. ज्या उमेदवाराकडून आवेदन अर्जाचे शुल्क आकारले आहे त्याच उमेदवारास **Cancel Application** बटन प्राप्त होईल. प्रथम भरलेले ॲप्लीकेशन **Cancel** केल्यानंतर ॲप्लीकेशन शुल्क परत मिळणार नाही. प्रथम केलेले ॲप्लीकेशन **Cancel** केल्यानंतर दुस-यांदा ॲप्लीकेशन भरण्याकरिता पुन्हा रु.१००/- प्रवेश शुल्क आकारले जाईल.

५. !!आवेदनअर्ज!! भरण्याची ठिकाणे **www.mahapoliceonline.org** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरता येईल.

६. आवेदन अर्ज एकदा **SUBMIT** केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. काही कारणास्तव दुरुस्ती करावयाची झाल्यास उमेदवार **Profile** वर जावून आवेदन अर्ज रद्द करुन आवश्यक दुरुस्ती करुन शकतात. हि सुविधा ज्यांनी शुल्क भरले आहेत. त्यांच्या करीताच उपलबध राहील.

७. उमेदवार ज्या प्रवर्गात मोडतो त्या प्रवर्गाची ( समाजिक/समांतर ) माहिती, वैयक्तीक आणि शिक्षणाची अचुक माहिती असणे आवश्यक आहे. उमेदवारास कोणत्याही एका समांतर आरक्षणाचा लाभ देय राहील.

८. उमेदवाराविरुध्द गुन्हा दाखल असेल तर गुन्हयाच्या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे.

९. पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमदेवारांचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.

१०. अर्जासोबत रुपये १००/- इतकी रक्कम फी म्हणुन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत भरु शकतात. ज्या उमेदवारांकडे इंन्टरनेट सुविधा उपलब्ध नसेल किंवा इंटरनेटचा वापर करणेकरीता ज्यांना अडचणी येत असतील, असे उमेदवार ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** यांचेकडे जावून निःशुल्क आवेदन अर्ज करु शकतात या निःशुल्क सुविधामध्ये आवेदन अर्ज भरणे, बँक चलनाची प्रिंट आऊट मिळणे तसेच पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडीची नोंद करणे राहील. परंतु उमेदवारास पुष्टीकरण, प्रवेश पत्र किंवा इतर कोणत्याही कागपत्रांच्या प्रतिची प्रत **(Printout)** ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** कडून हव्या असतील तर प्रती प्रत रु.३/- अशा दराने **(Printout)** उपलब्ध करुन देण्यात येईल.

११. उमेदवाराने भरतीकरिता येतांना सोबत प्रवेश पत्र आणावे.

१२. आवेदन अर्ज भरण्याकरीता सर्व घटकात उपलब्ध असलेल्या संस्थेचे केंद्र **www.mahapoliceonline.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यापैकी या घटकात आवेदन अर्ज भरण्याकरिता उपलब्ध असलेली ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर **(OAC)** खालील नमुद ठिकाणी उपलब्ध होतील.

| Sr. No | OAC Name | Address | Pincode | City | Telephone | Contact Person Name | Contact Person mobile |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यंकटेश कॉम्पुटर सेंटर | मु.पो.विजयगड मेन रोड | ४३१७१४ | कंधार | ०२४६६ २२४५८१ | लक्ष्मीकांत दादाराव जायभाये | ९९६००८००६६ |
| २) | गुरुकृपा कॉम्पुटर एज्युकेशन सेंटर | पहिला माळा वामन नगर स्टॉप पुर्णा रोड | ४३१६०५ | नांदेड | ०२४६२ ६२६६६६ | श्री.वट्टमवार पांडुरंग | ९९७०७९७४०४ |
| ३) | शिवप्रकाश एन. बजाज | लाहोटी कॉम्प्लेक्स उदय झेरॉक्सचे मागे एस.पी.ऑफीस समोर वजिराबाद | ४३१६०१ | नांदेड | ०२४६२ २४०१५१ | शिवप्रकाश एन.बजाज | ९४२१९७२६२६ |
| ४) | श्री.राघवेंद्र स्वामी कॉम्पुटर एज्युकेशन | एअरटेल टॉवरच्या खाली जिल्हेवार बिल्डींग गणेशनगर | ४३१६०२ | नांदेड | ०२४६२ २५३३७० | जोशी आनंद के. | ९४२२१५०५५३ |
| ५) | पार्थ कॉम्पुटर सर्व्हीस | जनता हायस्कूल कॉम्प्लेक्स | ४३१७०९ | नायगांव | ०२४५६ २६२००७ | अमोघे रामकिशन | ९७६६८०९२५३ |
| ६) | शिंदे झेरॉक्स सेंटर | महा.ग्रामीण बँकेजवळ नवा सराफा | ४३१७१७ | देगलूर | ०२४६३ २५७९३५ | शिंदे यादव | ९०११५९२७५९ |
| ७) | जय कालेश्वर इंटरनेट कॅफे | कालेश्वर कमाणी जवळ,विष्णुपुरी | ४३१६०६ | नांदेड | ०२४६२ २२९२२५ | हंबर्डे कैलास | ९८६००७४४०४ |
| ८) | श्री.झेरॉक्स सेंटर | एनडी-४ रामनगर पोस्ट ऑफीस जवळ सिडको | ४३१६०३ | नांदेड | | भोसीकर गजानन बालाजी | ९२७३९६६७१७ |
| ९) | श्री.नेट कॅफे | गंधेवार कॉलीनी | ४३१८०१ | भोकर | ०२४६७ २२२०३० | कानडे प्रशांत | ८०५५९१७०३० |
| १० | देवाशिष इन्फोटेक | बस स्टँड समोर मेन रोड | ४३१७०८ | लोहा | | सतिश बच्चेवार | ९८९०००६३७१ |

१३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत तसेच बँकेत प्रवेश शुल्क भरण्याबाबतच्या पध्दतीच्या सविस्तर सुचना जाहिरातीत नमुद करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार अर्ज व शुल्क भरण्याची उमदेवाराने दक्षता घ्यावी.

१. शारीरिक पात्रतेत पात्र ठरलेल्या उमदेवारांच्या प्रमाणपत्रांची छाननी करण्यात येईल. प्रमाणपत्रांच्या छाननीच्यावेळी उमदेवाराने ( लागु असलेल्या) प्रमाणापत्राची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका-याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यासोबत मुळ (**Original**) प्रमाणपत्र दाखवणे बंधनकारक आहे. उमदेवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या सादर केल्यास त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास अमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैद्यता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापुर्वीची असणे आवश्यक आहे.

२. गृहविभाग, शासन निर्णय क्र. आरसीटी-०३१०/प्र.क्र.२१२/पोल-५अ, दिनांक १६.०४.२०१० नुसार क्रिमीलेअरचे तत्व लागू करण्यात आलेल्या प्रवर्गातील उमेदवारांना जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अशी दोन प्रमाणपत्र असतील तरच आरक्षणाविषयक लाभ देय ठरतील ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील तर आरक्षणविषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमदेवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल व खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोगटाच्या अटी लागू राहतील.

१४. वर नमुद केल्यानुसार साक्षांकित केलेल्या खालील प्रमाणपत्रांच्या प्रति उमेदवारांनी सादर करणे आवश्यक राहील.

a. शाळा सोडल्याचा दाखला.

b. शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक,

c. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१ /०९/१६ब,दि.०५/११/२००९ नुसार मागासवर्ग उमदेवाराने जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवारांनी जात वैद्यता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

d. प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या कडील प्रमाणपत्र.

e. अधिवास ( डोमेसाईल ) प्रमाणपत्र.

f. महिला व बाल कल्याण विभाग तसेच समाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार
उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे ( नॉन-क्रिमीलेअर ) निकटतम वर्षाचे प्रमाणपत्र.

g. विविध आरक्षण प्रवर्गात मोडणा-या उमदेवारांनी संबधीत प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

१५. सर्व अटीची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार पुढील चाचणीसाठी पात्र राहतील.

१६. भरती प्रकियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्याकरीता उमेदवारास प्रवास खर्च दिला जाणार नाही.उमेदवारास प्रत्येक चाचणीकरीता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१७. पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१८. पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१९. भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२०. उमेदवारास पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेची रुपरेखा **(Scheduled)** उमेदवाराच्या भरती करीता उघडण्यात आलेल्या प्रोफाईलवर, ऑनलाईन ॲप्लीकेशन **(OAC)** सेटंर वर तसेच घटकातील मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध होईल.

२१. सदर पोलीस भरतीची जाहिरात या घटकाच्या **www.nandedpolice.org** तसेच **www.mahapolice.gov.in** या संकेतस्ळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**महत्वाची टिप** :-उमेदवाराने पोलीस शिपाई ( सेवाप्रवेश ) नियम २०११ चे कृपया अवलोकन करावे. सदर सेवाप्रवेश नियमातील अटी व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहतील. सदरचे सेवाप्रवेश नियम **www.mahapoliconline.org** या संकेत स्थळावर (**Home Page**) उपलब्ध आहे.

**(शहाजी उमाप)**
पोलीस अधिक्षक, नांदेड.